पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / ९९५ / २०१२
दिनांक - १३ / ०७ / २०१२

प्रति,

मा.............................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची सभा दिनांक - १७ / ०७ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - १७ / ०७ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\agenda४doc.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ६**

दिनांक :- १७ / ०७ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - १७ / ०७ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक १ :- मौजे चिंचवड येथील आरक्षण क्र. १८५ विसंगत उद्योग ( Non Conferminf Industries ) या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागणार असल्याने या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २ :- मौजे पिंपरी, ता.हवेली येथील सि.स.नं.५७४३ पै., आरक्षण क्रमांक ११० दुकानदारांचे पुनर्वसन आरक्षणाने बाधित जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेकामी सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३:- मौजे भोसरी (कासारवाडी) येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये स.नं.४९९ पै, ५०० पै या मिळकती मध्ये आरक्षण क्रमांक २९ बहुउद्देशिय सभागृहासाठी ०.३५ हे क्षेत्र आरक्षित आहे. सदर आरक्षणावर झोपडपट्टी आहे. सदर आरक्षित जागेवर सभागृह बांधून मिळणेकामी स्थानिक मा. नगरसदस्यांनी मागणी केलेली आहे. तरी सदर आरक्षणाचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये भूसंपादन करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ९९५ / २०१२
दिनांक :- १३ / ०७ / २०१२
टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.